# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/११/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १४/११/२०१६ रोजी २१.०० वा.ते १५/११/१६ चे ०५.०० वा दर. यातील फिर्यादी जितेंद्र सुखदेव मेश्राम वय ३२ वर्ष रा. पलाडी हा कव्वाली पाहण्यास टेकेपार येथे गेला असता त्यानी त्याची हिरो होन्डा स्प्लेंडर मोटार सायकल क्र.एमएच ३६ डी ५६६० कि. १०,०००/रू ची रोडचे बाजुला ठेवुन कव्वाली पाहण्यास गेला व कार्यक्रमा नंतर मोटार सायकल ठेवलेल्या ठिकानी येवुन पाहीले आसता मोटार सायकल टेकेपार ते कोका जाणा–या रोडवर दिसुन न आल्याने कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) शेतात लावलेली मोटार पंपची चोरी. :–**

दिनांक १५/११/२०१६ चे १८.३० वा. ते १६/११/२०१६ रोजी १५.०० वा. यातील यातील फिर्यादी मुरलीधर शोभाराम ठबाले वय ३९ वर्ष रा. महालगाव हे शेतातील विहीरीवर लावलेली सि.आर.आय. मोनॉब्लक कंपनीची मोटार पंप कि. ७,९००/रू ची कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गि–हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**३ क्षुल्लक कारणावरून काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद ;–**

दिनांक १०/११/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी हंसराज भाउराव गुर्वे वय २५ वर्ष रा. नवरगाव हा घरी जेवन करीत असतांना आरोपी याने शिवीगाळ करून रोडवर बोलावुन विनाकारण भांडण करून मारण्यापीटण्याची धमकी दिली व फिर्यादी सोबत असलेला जखमी राम मदन गुर्वे वय २५ वर्ष रा. नवरगाव यांचे सोबत सुध्दा भांडण करून त्याला काठीने डाव्या खादयावर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व जखमीचे माराचे एक्सरे रिपोर्ट मध्ये फॅक्चर असल्याची डॉ.रिपोर्ट प्राप्त झाल्याने व चौकशी अहवाला वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२५,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा .माहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १६/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे भंडारा, तुमसर, साकोली, लाखनी व जवाहरनगर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४२ लिटर हातभट्टी दारु कि. ४२००/–रू. व ७ लिटर २० मिली लिटर कि. १,९५०/–रु. असा एकुण कि. ६,४६७/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १६/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८५ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस, अवैध प्रवासी ०२ व ईतर वाहनांवरती ७६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

१७/११/१६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.